# महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई

गेट क्र .०२, कामा व आल्बेस रुग्णालय, पहिला मजला, नविन प्रशासकिय इमारत,
महापालिका मार्ग, धोबी तलाव, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनी क्र.९१-२२-२२६२०३६०
ई-मेल आयडी -mpmcmumbai२०१७@gmail.com
वेबसाईट -www.maharashtraparamedicalcouncil.org


---

जा.क्र.मपवैप/जाहिर सुचना-२०२३/१५९/२०२३ दिनांक-०८/०६/२०२३

## जाहिर सुचना

महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियमातील कलम २(घ) (ज) प्रमाणे मान्यताप्राप्त परावैद्यकीय अर्हतेस नोंदणी देण्यात येते. अधिनियमातील कलम २(ज) प्रमाणे "मान्यताप्राप्त परावैद्यक अर्हता" याचा अर्थ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ किंवा कायद्याद्वारे स्थापन केलेले इतर कोणतेही विद्यापीठ किंवा याबाबत राज्य शासनाने मान्यता दिलेली इतर कोणतेही संस्था यांच्याद्वारे देण्यात येणाऱ्या, कोणत्याही परावैद्यकीय अर्हतेमधील पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा पाठ्यक्रम असा होय. अधिनियमातील कलम २ (छ) प्रमाणे "मान्यताप्राप्त परावैद्यक संस्था" याचा अर्थ, परावैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मान्यता दिलेले कोणतेही वैद्यकीय महाविद्यालय किंवा रुग्णालय किंवा इतर आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये सद्यास्थितीत शासन मान्यता प्राप्त नसलेली विविध विद्यापीठ व संस्था स्थापण आहेत. यामध्ये परावैद्यक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांची व पालकाची दिशाभुल करणाऱ्या जाहिराती मोठ्याप्रमाणात प्रसिध्द होत असतात. यामध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत आहेत.

त्यामुळे पालकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. तरी परावैद्यकीय शिक्षण (प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्ष-किरण तंत्रज्ञ, नेत्रविषयक तंत्रज्ञ व इत्यादी.) घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था, विद्यापीठ किवा अभिमत विद्यापीठा मध्ये प्रवेश घ्यावा जेणे करुन भविष्यात होणाऱ्या शैक्षणिक व आर्थिक नुकसान टळेल.

उपरोक्त सदर्भात परावैद्यक अर्हता नोंदणी व माहिती परिषदेच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. (www.maharashtraparamedicalcouncil.org)

प्रबंधक
**महाराष्ट्र परावैद्यक परिषद**